# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांक :-१२/१२/२०२५

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.२३/१२/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

**मनपा वाहन क्र. एमएच-०४-केएफ-४१२९ टाटा ७०९ (मॉडेल सन २०२०) ची दुरुस्ती :-**

**हायड्रॉलिक बेल्टची दुरुस्ती :-** सदर वाहनाचा मेन अल्टरनेटरची मेल पुल्ली जाम झाल्यामुळे घासुन गरम होऊन बेल्ट तुटला आहे. तरी दुरुस्ती कामी सर्व प्रथम अल्टरनेटरची वायरिंग काढणे. लॉकनट खोलुन अल्टरनेटर बाहेर काढणे. पुल्लीचा लॉक नट खोलुन पुलरच्या साह्याने पुल्ली व बेरींग बाहेर काढुन स्टँडर्ड कंपनीची (SKF) २२ बेरींग फिट करुन पुल्ली पुन्हा फिट करुन नविन बेल्ट साईज १२४५ ८K फिटींग करुन योग्य ते टेंशन देऊन बेल्ट सेट करुन दुरुस्ती करणे.

**बुमची दुरुस्ती :-** दुरुस्ती कामी सर्व हायड्रॉलिक पाईप खोलुन लॉक बोल्ट खोलुन पिन बाहेर काढुन क्रेनच्या साह्याने बुम बाहेर काढणे. बुम २ व बुम १ चे मेन होल मधील गन मेटल बुश हॅमरिंग करुन कट करुन बाहेर काढणे. सदर मशिन होल बेसिक पद्धतीची असल्यामुळे बुम क्र. २ व बुम क्र. १ ला गन मेटल बुश कटींग, पॉलिश, करुन प्रेसच्या साह्याने फिटींग करुन बुम ०२, ०१ ला नविन पिन EN८ मटेरिअल मध्ये बनवुन हॅमरिंग व ग्रीसिंग करुन फिटींग करुन लॉक करणे. दोन्ही बुमला हायड्रॉलिक प्रेसच्या साह्याने शक्य तेवढे सरळ करुन पुन्हा फिटींग करुन सर्व हायड्रॉलिक पाईप फिटींग करुन एअर काढुन वाहन दुरुस्ती करणे.

**अल्टरनेटरची दुरुस्ती :-** १) अल्टरनेटरची वायरींग काढुन अल्टरनेटर बाहेर काढणे. २) अल्टरनेटर पुर्णपणे डिसमेंटलिंग करुन सर्व पार्ट पेट्रोल ने वॉश करणे. ३) अल्टरनेटरचे खराब झालेले पार्ट डायवोट, डायवोट प्लेट, कट आऊट नविन फिट करणे. ४) अल्टरनेटर पुन्हा फिटींग करणे. ५) फॅन बेल्ट नविन फिटींग करणे.

**वायपरची दुरुस्ती :-** वाहनाचे वायफर मोटर पुर्णपणे खराब झाली असुन वायपर ऑपरेट होत नाही दुरुस्ती करीता नविन वायपर मशिन फिट करुन केम रॉड, वायपर ब्लेड, वायपर स्टॅण्ड नविन फिटींग करुन वायरींग चेक करुन वायपर चालु करणे.

Choudhari

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

दिनांक१२/१२/२०२५
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ